रयत शिक्षण संस्थेचा आजवर झालेला प्रवास व प्राथमिक शिक्षणापासून. उच्चशिक्षणापर्यंत आखली गेलेली धोरणे यांचे वर्तमान परिस्थितीत परीक्षण करताना, आज नव्या पिढीला लोकशाही मूल्यव्यवस्थेची चाड नाही आणि राज्यकर्त्या पक्षांना शिक्षणाविषयी गांभीर्य नाही, अशी विसंगती निर्माण झालेली दिसते. मेकॉले, वुड, हंटर आयोगापासून सुरु झालेला हा प्रवास आज एका वेगळया वळणाजवळ येऊन पोहोचलेला आहे. एकीकडे मोफत व अत्यल्प दरात इंटरनेटला चालना देऊन 'डिजिटल इंडियाचा' बोलबाला आणि दुसरीकडे शिक्षणाच्या खाजगीकरणाला चालना देऊन शिक्षण क्षेत्रातील आर्थिक सहभागातून अंग काढून घेण्याचा प्रकार वाढीस लागला आहे. उच्च शिक्षणाच्या बाबतीत देखील यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही. मुदलीयार आयोग, कोठारी आयोग, सॅम पित्रोदा यांचे Knowledge Commission, २०१६ चे राष्ट्रीय शिक्षणविषयक धोरण व पाठोपाठ महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायद्याची नव्याने अंमलबजावणी अशा एका एका संक्रमित अवस्थेत शिक्षणक्षेत्र आहे. काळानुरुप शिक्षणपद्धतीत बदल करणे आवश्यकच असते.परंतु बदलाच्या नावाखाली स्वायत्ततेला दिलेले प्राधान्य, खाजगी व कौशल्य प्रदाता संस्थांना प्रोत्साहन, अत्युच्च गुणवत्ता व रोजगाराभिमुख शिक्षण यांना महत्त्व यामुळे पारंपरिक शिक्षण देणाऱ्या संस्था-महाविद्यालयांसमोर नवे आव्हान व स्पर्धा निर्माण झालेली आहे. अनेक आंतरराष्ट्रीय संस्था, उद्योग-व्यवसायाचे गट यात उतरत आहेत. रयत शिक्षण संस्थेने देखील पारंपरिक शिक्षण व्यवस्थेतून बाहेर पडण्यासाठी हे बदल स्वीकारण्यास सुरुवात केली आहे.

सारांश:

कर्मवीर या शिक्षण पंढरीच्या वारकऱ्याने पेरलेली मूल्ये, केलेला शिक्षणप्रसार व उलटा केलेला मेकॉलेचा

286

आहे. परंतु रयत शिक्षण संस्था यास अपवाद आहे. कर्मवीरांनी त्याच काळात काळाची पावले ओळखून अनेक प्रयोग केले. काय आहे यापेक्षा काय घडू शकेल? याचा विचार करुन चारभिंतीसारख्या बरड माळरानाचे सुंदर बगिच्यात त्यांनी रुपांतर केले. आपल्या विद्यार्थ्यांकरवी शाळा उभ्या केल्या. या शाळांमधून बाहेर पडलेले लाखो विद्यार्थी हीच आज संस्थेची संपत्ती ठरली आहे." पाश्चात्य देशातील विद्यापीठे माजी विद्यार्थी चालवितात. त्याप्रमाणेच गेल्या शंभर वर्षात संस्थेने जी प्रगती केली आहे त्यामागे संस्थेच्या त्या त्या काळातील माजी विद्यार्थ्यांचे पाठबळदेखील कारणीभूत आहे. कर्मवीरांबरोबरच लक्ष्मीवहिनींचा असीम त्याग आणि समर्पणाचे संस्कार या विद्यार्थ्यांच्या मनावर होत असतात. तसेच एका जपानी म्हणीमध्ये म्हटल्याप्रमाणे 'तुम्ही जर एक वर्षाच विचार करीत असाल तर धान्य लावा! तुम्ही जर दहा वर्षाचा विचार करीत असाल तर वृक्ष लावा! आणि तुम्ही जर शंभर वर्षाच विचार करीत असाल तर माणसे पेरा!' या उक्तीप्रमाणे कर्मवीरांनी आयुष्यभर माणसे पेरली. जी माणसे निस्वार्थपणे संस्थेच्या मदतीला उभी राहिली.म्हणूनच आज संस्थेचा वेलू गगनावर गेला आहे.

जगातील सर्वाधिक मोठी लोकशाही प्रणाली असलेला देश म्हणून भारताचा उल्लेख केला जातो. स्वातंत्र्य , समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांची कर्मवीरांनी नेहमीच प्रतिष्ठा राखली. तसेच लोकशाहीचा पाया मजबूत करायचा असेल तर त्यास शिक्षणाची आवश्यकता असते. दि.२६ सप्टेंबर १९४५ रोजी कोल्हापूर येथे भरलेल्या 'महाराष्ट्र विद्यार्थी काँग्रेसच्या' अधिवेशनात बोलताना, "कोणत्याही राष्ट्रसुधारणेचा व खऱ्या लोकशाहीचा पाया सार्वत्रिक शिक्षण प्रसार हाच आहे. हे विचारांती कोणासही पटेल. जोपर्यंत देशातील बहुजन समाज हा अज्ञानाच्या अंधःकारात चाचपडत आहे तोपर्यंत देशसुधारणेचा प्रयत्न करणे बहुतांशी पालथ्या घागरीवर पाणी ओतल्यासारखे नाही का होणार?" असे उद्‌गार त्यांनी काढले. तसेच जातीय विषमतेवर भाष्य करीत असताना, "हरिजन बांधवांची सुधारणा केवळ मंदिर प्रवेशाने अगर कायदे करुन होणार नाही. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे. व त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे." असे 'मानवता' मासिकास शुभसंदेश देताना लिहिले. आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक समतेचा त्यांनी केलेला हा पुरस्कार त्यांच्या द्रष्टेपणाचा प्रत्यय देतो.

रयत शिक्षण संस्था : बदलती शिक्षण प्रणाली:

रयत शिक्षण संस्थेचा आजवर झालेला प्रवास व प्राथमिक शिक्षणापासून उच्चशिक्षणापर्यंत आखली गेलेली धोरणे यांचे वर्तमान परिस्थितीत परीक्षण करताना, आज नव्या पिढीला लोकशाही मूल्यव्यवस्थेची चाड नाही आणि राज्यकर्त्या पक्षांना शिक्षणाविषयी गांभीर्य नाही, अशी विसंगती निर्माण झालेली दिसते. मेकॉले, वुड, हंटर आयोगापासून सुरु झालेला हा प्रवास आज एका वेगळया वळणाजवळ येऊन पोहोचलेला आहे. एकीकडे मोफत व अत्यल्प दरात इंटरनेटला चालना देऊन 'डिजिटल इंडियाचा' बोलबाला आणि दुसरीकडे शिक्षणाच्या खाजगीकरणाला चालना देऊन शिक्षण क्षेत्रातील आर्थिक सहभागातून अंग काढून घेण्याचा प्रकार वाढीस लागला आहे. उच्च शिक्षणाच्या बाबतीत देखील यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही. मुदलीयार आयोग, कोठारी आयोग, सॅम पित्रोदा यांचे Knowledge Commission, २०१६ चे राष्ट्रीय शिक्षणविषयक धोरण व पाठोपाठ महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायद्याची नव्याने अंमलबजावणी अशा एका एका संक्रमित अवस्थेत शिक्षणक्षेत्र आहे. काळानुरुप शिक्षणपद्धतीत बदल करणे आवश्यकच असते.परंतु बदलाच्या नावाखाली स्वायत्ततेला दिलेले प्राधान्य, खाजगी व कौशल्य प्रदाता संस्थांना प्रोत्साहन, अत्युच्च गुणवत्ता व रोजगाराभिमुख शिक्षण यांना महत्त्व यामुळे पारंपरिक शिक्षण देणाऱ्या संस्था-महाविद्यालयांसमोर नवे आव्हान व स्पर्धा निर्माण झालेली आहे. अनेक आंतरराष्ट्रीय संस्था, उद्योग-व्यवसायाचे गट यात उतरत आहेत. रयत शिक्षण संस्थेने देखील पारंपरिक शिक्षण व्यवस्थेतून बाहेर पडण्यासाठी हे बदल स्वीकारण्यास सुरुवात केली आहे.

सारांश:

कर्मवीर या शिक्षण पंढरीच्या वारकऱ्याने पेरलेली मूल्ये, केलेला शिक्षणप्रसार व उलटा केलेला मेकॉलेचा

www.research-Chronicler.com

e-ISSN - 2347-503X
p-ISSN - 2347-5021



Research Chronicler

International Multidisciplinary Research Journal

Vol. VI Spl. Issue IV November 2018

: Executive Editor :
Dr. Manjushri Bobade

: Editor-In-Chief :
Dr. Sanjay Nagarkar

287

University Grants Commission, New Delhi Recognized Journal No. 41311
ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

Research Chronicler

University Grants Commission, New Delhi Recognized Journal No. 41311

Link:https://www.ugc.ac.in/journallist/subjectwisejurnallist.aspx?tid=UmVzZWFyY2ggQ2hyb25pY2xlcg==&&did=Q3VycmVudCBUaXRsZXM=

ISSN 2347 – 5021 (Print); 2347 – 503X (Online)

A Peer-Reviewed Refereed and Indexed

Multidisciplinary International Research Journal

Volume VI Issue IV: November – 2018

Executive Editor

Prin. Dr. Manjushri Bobade

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune, (M.S.) India

Editor-In-Chief

Dr. Sanjay Nagarkar

Head, Department of Marathi

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune, (M.S.) India

Editorial Board

Dr. Vilas Sadaphal, Pune, India
Dr. Savita Patil, Pune, India
Prof. Eknath Zaware, Pune, India
Dr. Atul Chaure, Pune, India
Prof. Kiran Kumbhar, Pune, India
Dr. A.P. Pandey, Mumbai, India
Dr. Patricia Castelli, Southfield, USA
Christina Alegria, Long Beach, USA
Prin. H.V. Jadhav, Navi Mumbai, India
Dr. Adrianne Santina, McMinnville, USA
Prof. C.V. Borle, Mumbai, India
Dr. Nirbhay Mishra, Mathura, India

Advisory Board

Dr. S.T. Gadade

Principal, C.K. Thakur College
New Panvel, India

Dr. R.M. Badode

Professor & Head
Department of English
University of Mumbai, India

Dr. G.T. Sangale

Principal, Veer Wajekar College
Phunde, India

34	प्रा. डॉ. जी. पी. बोडखे	पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील: बहुआयामी व्यक्तित्व	131
35	जीवप्रसाद उदय माजगांवकर	महाराष्ट्राच्या सामाजिक व मानसिक जडण घडणीत रयत शिक्षण संस्थेचे योगदान	134
36	डॉ. पोपट सिनारे	पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य	136
37	श्री. सुरेश विठ्ठल मेहेर	कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य	138
38	अमोल रवींद्र बागड	रयत शिक्षण संस्था विकास आणि वाटचाल	141
39	प्रा. डॉ. प्रकाश सूर्यवंशी	कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक विचार: एक दृष्टिक्षेप	143
40	प्रा. विजयश्री गवळी	पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य	146
41	प्रा. जाधव सावित्री दत्तात्रय	कर्मवीर भाऊराव पाटील यांचे क्षेत्रातील योगदान	149
42	विलास विठ्ठल नाबदे	महाराष्ट्राच्या राजकीय विकासात रयत शिक्षण संस्थेचे योगदान	151
43	प्रकाश रणसिंग	महाराष्ट्रातील भाषिक विविधता: रयत शिक्षण संस्थेसमोरील आव्हान	154
44	किरण गणपत कुंभार	कर्मवीर भाऊराव पाटील आणि ग्रामीण शिक्षण	157
45	प्रा. डॉ. सुनील लक्ष्मण परदेशी	कर्मवीर भाऊराव पाटील: एक समाज सुधारक	160
46	प्रा. डॉ. अतुल चौरे व प्रा. चिंतामण धिंदळे	शैक्षणिक क्षेत्रातील महामेरू: पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील	162

University Grants Commission, New Delhi Recognized Journal No. 41311
ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

"शैक्षणिक क्षेत्रातील महामेरू पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील"

प्रा. डॉ. अतुल चौरे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज,

औंध, जि. पुणे.

प्रा. चिंतामण धिंदळे

महात्मा फुले आर्टस्,सायन्स अँन्ड कॉमर्स

कॉलेज, पनवेल.जि.रायगड.

शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजाच्या शैक्षणिक सामाजिक कार्यासाठी स्वतःचे जीवन समर्पित केले. खेड्यापाड्यातील बहुजन समाजाला शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त केले. सर्व जाती-धर्माच्या मुलांसाठी वसतिगृहे काढली. शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या मनात श्रमाची प्रतिष्ठा वाढावी, म्हणून कमवा शिका योजना सुरू केली. विद्यार्थ्यामध्ये उच्च विचारांचा आदर्श घालून दिला. स्वाभिमानी पिढी निर्माण करून, त्यांच्यामध्ये स्वाभावीवृत्ती निर्माण केली. सुरुवातीच्या काळात कर्मवीर भाऊराव पाटील ब्राह्मणेतर व सत्यशोधक चळवळीमध्ये कार्य करीत होते. परंतु नंतर कर्मवीरांनी शैक्षणिक कार्यासाठी उभे आयुष्य घालविले. कर्मवीर यांचे आयुष्य एखाद्या ऋषिप्रमाणे होते. त्यांच्या कार्याबद्दल समाजाने त्यांना कर्मवीर ही पदवी बहाल केली. भारत सरकारने त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांना पद्मभूषण किताब दिला. तसेच पुणे विद्यापीठाने त्यांना डी.लिट.पदवी बहाल केली. महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षि शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याचा वसा आणि वारसा पुढे कर्मवीरांनी चालविला. समाजपरिवर्तनासाठी मानवधर्माची कास धरून समाजात शैक्षणिक परिवर्तन केले. तसेच लक्ष्मीबाई पाटील सावलीप्रमाणे कर्मवीरांच्या सोबत उभ्या राहिल्या. त्यामुळे रयत शिक्षण संस्था उभी राहू शकली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आजोबांचा एकदा जातनिवाडा करताना अपमान झाला. म्हणून त्यांनी आपल्या मुलाला पायगोंडा पाटलांना शिकविले. त्यामुळे त्यांना सरकारी खात्यात कारकून म्हणून नोकरी मिळाली. ते प्रामाणिक, कष्टाळू, निर्व्यसनी होते. परंतु नोकरी शिवाय कोणत्याही समाजकार्यात सहभागी झाले नाहीत. त्यांची पत्नी गंगाबाई ह्या स्वभावाने हुशार, कर्तव्यदक्ष, स्वाभिमानी आणि संसारात निपुण होत्या. त्यांना चार मुलगे व दोन कन्या होत्या. (बाबुराव, तात्या, जयसिंगपूर,बळवंतराव, द्वारका, अक्का) हीमुले होती.

भाऊराव पाटलांचा जन्म कुंभोज या गावी जिल्हा कोल्हापूर येथे २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. भाऊरावांचे वडील सरकारी खात्यात असल्याने त्यांची सातत्याने बदली होत होती. त्यामुळे भाऊरावांना वेग-वेगळ्या गावी वेग-वेगळ्या शाळांमध्ये जावे लागत असे. सहाजिकच त्यामुळे त्यांचा मित्रपरिवार आणि अनुभव इतर मुलांपेक्षा अधिक वाढलेला दिसतो. भाऊरावांनी चौथी पर्यंतच्या शिक्षणानंतर इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी कोल्हापूरच्या जैन वसतिगृहात प्रवेश घेतले. कोल्हापूरच्या परिसरात शाहूमहाराजांनी जातिभेद नष्ट करून समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू केलेला होता. महाराजांनी वेगवेगळ्या जातीजमातीच्या मुलांसाठी वसतिगृहांची स्थापना केली होती. उदा. मराठा, जैन, लिंगायत, अस्पृश्य, सारस्वत, दैवज्ञ, शिंपी, मुसलमान, वंजारी इतर वसतिगृहांची स्थापना केली होती. भाऊराव पाटील वस्तीगृहात शिक्षण घेत असताना शाळेतील इतर कार्यक्रमात अग्रेसर होते. क्रीडा, शिस्त, वेळेवर शाळेत येणे. शिस्तीचे पालन करणे इत रगोष्टीं मध्ये अग्रेसर होते. मात्र जैन वस्तीगृहात अस्पृश्यता पाळली जात असल्या मुळे भाऊरावांच्या मनात अस्पृश्यता आणि अंधश्रद्धे विषयी मनस्वी चीड होती. म्हणून भाऊराव त्या विरोधात बंड करीत होते. उदा. जेवण करताना सोवळं न घालणे, अंघोळी पूर्वी दाढी न करणे इतर गोष्टींचा विरोध करताना दिसतात. त्या मुळे भाउरावांना वसतिगृहां मधून काढून टाकण्यात आले होते. भाउरावांना वसतीगृहा मधून काढून टाकल्याने त्यांच्या वर्गमित्राने बाळासाहेब खानविलकर यांनी भाऊरावांना शाहूमहाराजांच्या राजवाड्यातील आपल्या खोलीत

आश्रय दिला. त्यामुळे छत्रपती शाहूमहाराजांच्या स्वभावातील चांगले पैलू पाहिला मिळाले. त्याच बरोबर महाराजांना भाऊरावांचा निर्व्यसनी स्वभाव, सत्य बोलण्याची सवय, वेळेवर व्यायाम करण्याची सवय या बद्दल आपुलकी वाटली सहावी इंग्रजीच्या वर्गात भाऊराव नापास झाले. तेव्हा त्यांनी वर्ग शिक्षक वि.के. कुलकर्णी यांना वरच्या वर्गात घालण्याची विनंती केली. पण त्यांनी त्यास नकार दिल्याने, भाऊरावांनी शाळेला कायमचा रामराम ठोकला.

भाऊराव अठरा वर्षांचे असताना, त्यांचे लग्न बारा वर्षाच्या सौ. लक्ष्मीबाई यांच्याशी झाले. लक्ष्मीबाई घरकाम आणि स्वयंपाकात हुशार होत्या. त्यांचा स्वभाव नम्र होता. थोरा मोठ्यांची कामे करण्यात त्या निपुण होत्या. त्या काळात लक्ष्मीबाई घरकामा बरोबर शेतीची कामे करीत होत्या. भाऊराव सांगली या ठिकाणी इंग्रजी शिक्षणासाठी गेले. तेव्हा एका आडावर एक अस्पृश्य स्त्री पाणी मिळावे म्हणून विनवणी करीत होती. पण कोणी पाणी देत नव्हते. तेव्हा भाऊरावांनी रागाने राहट आडात ढकलून दिला. तेव्हा भाऊरावांचे आई-वडील म्हणालेकी, आमच्या भाऊला अस्पृश्यां बद्दल फार कणव आहे. या वरून असे दिसते की, लहान पणा पासूनच भाऊरावांना समाजातील विषमतेविरुध्द चीड होती. एकदा वडिलांना भेटण्यासाठी इस्लामपूरला जाताना भाऊरावांना एक मुलगा वर्गाबाहेर बसलेला दिसला. तेव्हा भाऊरावांनी गुरुजींना त्याला वर्गात घ्यायला सांगितले. पण गुरुजींनी त्याला वर्गात घेतले नाही. म्हणून भाऊराव त्याला (ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप) याला घरी घेऊन आले. व कोल्हापूरच्या मिस क्लार्क होस्टेलमध्ये प्रवेश मिळवून दिला. पुढे ज्ञानदेवने चांगला अभ्यास केला. मॅट्रिकची परीक्षा पास झाला. आणि मूकनायक पाक्षिक संपादक झाला. पुढे मुंबई कायदे मंडळाचा सरकारनियुक्त सभासद (१९२३) झाला. यामधून कर्मवीर अण्णांची दूरदृष्टी दिसून येते.शाळेमधून घरी राहिल्यानंतर भाऊराव व्यापारी शिक्षण घेण्यासाठी मुंबईला गेले. पण त्यांचे मन त्या व्यवसायात रमले नाही. म्हणून त्यांनी सातारा शहरात भाड्याने जागा घेऊन शिकवण्या करण्याचे कार्य केले. पोप नावाच्या एका युरोपियन डेप्युटी कलेक्टरला मराठी शिकवण्याची पहिली शिकवणी मिळाली. तसेच पेठे नावाच्या असिस्टंट कलेक्टरच्या मुलाला संस्कृत शिकवण्याचेही कार्य त्यांनी केले. तासनतास ते शिकविण्याचे कार्य करीत असल्यामुळे सातारात पाटील मास्तर या नावाने ते प्रसिध्द झाले. सन १९१४ रोजी ताराबाई पार्क नावाच्या बागेतील एडवर्ड बादशहाच्या अर्धपुतळयाला कोणीतरी डांबर फासले. त्यावेळेस अण्णासाहेब लठ्ठे यांच्या विरोधात भाऊराव पाटलांनी साक्ष द्यावी म्हणून त्यांना बोलाविले. त्यासाठी भाऊरावांना पैसे आणि जमीन देण्याचे आमिष देण्यात आले. तेव्हा भाऊरावांनी खोटी साक्ष देण्यास नकार दिला. त्यामुळे निटवे नावाच्या ग्रहस्थाने भाऊरावांना घराला आग लावण्याच्या आणि घरातील पैसे चोरी करण्याचा आरोप करून जेलमध्ये टाकले. परंतु भाऊरावांनी अखेरपर्यंत खोटी साक्ष देण्यास नकार दिला. महात्मा गांधीजींच्या सत्याचे मूल्य जोपासणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील हे आजच्या तरुणांसाठी आदर्शवत आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील हे सत्यशोधक विचाराचे असल्यामुळे देवपूजा करीत नसत. जनसेवा हीच परमेश्वर पूजा मानीत. मात्र लक्ष्मीबाई जैन धर्माचे रीतीरिवाज पाळीत असत. घरातील सर्व कामे स्वतः करीत. त्यांचे बोलणे नम्र स्वरूपाचे होते. कोणालाही न दुखावता सर्वांची कामे करीत असत. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर महात्मा जोतिराव फुले आणि राजर्षि छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा पगडा होता. सत्यशोधक परिषदेमध्ये आपले विचार मांडताना भाऊराव म्हणाले की, "आपण सर्वजण सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते गावोगाव सभा भरवून व जलशांच्या माध्यमातून सत्यशोधक समाजाचे विचार मांडतो. परंतु हे सर्व अडाणी खेडुत विचार ऐकतात व माना डोलावतात. परंतु नवीन विचाराप्रमाणे वागत नाहीत. तेव्हा आपले प्रयत्न व कष्ट वाया जातात. तरुण पिढीला शिक्षण दिल्याशिवाय याचा परिणामकारक तोडगा मला दिसत नाही. म्हणून बहुजन समाजातील मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी आपण शिक्षण संस्था स्थापन करणे जरूर आहे."[१] म्हणून कर्मवीर अण्णांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले जिल्हा सातारा. या

289

ठिकाणी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.कर्मवीर ण्णांवर गांधी विचारांचा पगडा असल्याचे णवते. कारण १९२०च्या दरम्यान भाऊराव धीजींना भेटण्यासाठी मुंबईला गेले असताना, धीजींचा अर्धनग्न देह पाहून व त्यांची दिव्यवाणी कून तरुण भाऊराव पाटील मंत्रमुग्ध झाले. त्यानंतर ानी आमरण खादीचे कपडे वापरले. किर्लोस्कर खान्यात असताना भाऊरावांचे प्रपंचात फार नव्हते. त्यांनी स्वतःला सार्वजनिक कार्यासाठी ाहत घेतले होते. सहकाऱ्यांच्या मदतीने नेरले या ठिकाणी सर्व जातीच्या मुलांसाठी वसतिगृह काढले. ला उद्घाटनप्रसंगी त्यावेळचे कलेक्टर मि.इ.एल. म्हणाले की, "भाऊरावांनी सातारा िल्ह्यातील तीनशे प्रमुख खेड्यांमध्ये सभा घेऊन िक्षणाचे महत्त्व पटवून दिले. भाऊराव हे खऱ्या माजसुधारकांचे आदर्श आहेत."[२] यावरून असे वते की, भाऊराव हे कर्ते समाजसुधारक होते. ाऊरावांनी आपले उभे आयुष्य समाजकार्यासाठी चंदनाप्रमाणे झिजवीले.

ाऊरावांनी सातारा येथील राहत्या घरात १९२४ ाली एक हरिजन विद्यार्थी ठेवून सामाजिक कार्यास ुरुवात केली. पुढे त्यांच्या वसतिगृहात वेगवेगळ्या जाती-धर्माचे ३४ विद्यार्थी होते. त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल गांधीजींना जेव्हा समजले, तेव्हा ते सतिगृहास भेट देण्यासाठी आले. तेव्हा गांधीजी णाले"मला माझ्या साबरमती आश्रमामध्ये जे करता ले नाही. ते तुम्ही येथे यशस्वी करून दाखवले. आपल्या कार्यास माझे शुभाशीर्वाद."[३] भाऊरावांच्या कार्याचे मोठेपण महात्मा गांधीजींनी ओळखले होते. म्हणूनच भाऊरावांनी स्थापन केलेल्या वसतिगृहास भेट देण्यासाठी महात्मा गांधीजी आले. त्यांनी श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस नावाच्या पाटीचे उद्घाटन केले. पुढे शाहू महाराजांच्या मालकीची धनिणीची बाग भाऊरावांनी भाड्याने घेतली. आणि वसतिगृहातील ४० मुलांना तिथे ठेवून, स्वावलंबी शिक्षणाची योजना रावविली. वसतिगृहातील मुले जेवण बनवण्यापासून ांडी घासून ठेवण्यापर्यंत सर्व कामे करीत होती. तसेच शेतीची सर्व कामे विद्यार्थीच करीत होते. भाऊरावांच्या सामाजिक कार्यास श्री छत्रपती शाहू महाराजांचा राजाश्रय मिळाल्यामुळे त्यांचे समाजकार्य चिरकाल टिकून राहिले. धनिणीच्या बागेतील वसतिगृहातील विद्यार्थ्यांना उठवण्यासाठी भाऊराव पहाटेच येत असत. मुलांची प्रार्थना घेऊन, त्यांना अभ्यासाला बसवत. जे विद्यार्थी क्रीडा स्पर्धेत, स्नेह संमेलनात पारितोषिक मिळवतील त्यांना वसतिगृहात सत्कार करून, मुलांना प्रोत्साहन देत असत. त्यामुळे अनेक विद्यार्थी क्रीडा स्पर्धेत आणि सांस्कृतिक स्पर्धेतू पारितोषिक मिळवीत. वसतिगृहात अन्नधान्य. शिल्लक नव्हते. आणि पैसेही नव्हते. परंतु अचानक वसतिगृहास भेट देण्यासाठी भाऊरावांचे जुने स्नेही सदाशिव बाबाजी शेटे आले होते. त्यांनी वसतिगृहात राहणाऱ्या सर्व जाती-धर्माच्या मुलांना पाहिले. आणि त्यांना आनंद झाला. तेव्हा त्यांनी बोर्डिंगसाठी ५१ रुपयांची देणगी दिली. तेव्हा भाऊराव म्हणाले, चांगले कार्य पैशासाठी अडून राहत नाही. त्या कार्याच्या पाठीमागे पैसा चालत येतो. त्यामुळेच की काय शंभर वर्षानंतर सुद्धा रयत शिक्षण संस्थेचे कार्य अविरत सुरूच आहे. कर्मवीरांनी लावलेल्या वृक्षाचे वटवृक्षात रुपांतर झालेले दिसते.

कर्मवीर भाऊराव पाटलांनी १९३२ साली महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये झालेल्या 'पुणे करारानंतर' युनियन बोर्डिंगची पुणे येथे स्थापना केली. आजही पुण्यात युनियन बोर्डिंग सुरूच आहे. विविध जाती-जमातिची मुले या वसतिगृहात शिकत आहेत. सन.१९५२ रोजी अमेरिकेतील शिक्षणतज्ज्ञांनी रयत शिक्षण संस्थेला भेट दिली. तेव्हा ते म्हणाले की, "भाऊरावांच्या अंगी श्रद्धा, आत्मविश्वास, दूरदृष्टी आणि धमक यांचा सुरेख संगम झाला आहे. आणि म्हणूनच ते गुरु शोभतात. या संस्थेच्या कार्यकर्त्यांपासून स्वावलंबी तत्त्व व महात्मा गांधींपासून साधी राहणी ही तत्त्वे घेऊन मी मायदेशी घेऊन जाणार आहे."[४] यावरून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचे मोठेपण लक्षात येते. चांगल्या गुणांनी पास झालेल्या विद्यार्थ्यांना भाऊरावांनी परदेशात शिक्षणासाठी पाठवले. (इंग्लंड, लंडन, बर्मींगहॅम, एडनबरो. इतर) ठिकाणी अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी गेले. बहुजन समाजाच्या विकासासाठी आपले उभे आयुष्य चंदनाप्रमाणे झिजणारे

कर्मवीर भाऊराव पाटील हे आधुनिक युगातील महामेरू आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करताना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणाले होते की, "छत्रपती शिवाजी महाराज जाऊन तीनशे वर्षे लोटली. पण काळ त्यांना विसरला नाही. महात्मा फुले जाऊन सत्तर-ऐंशी वर्षे झाली. पण आपण त्यांना विसरलो नाही. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांना आपण विसरू शकत नाही. संत तुकारामांचे अभंग तीनशे वर्षानंतरही अभंगच राहिले. कर्मवीर आण्णा हे याच मालिकेतील होत."[५] यावरून आपणास पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची ओळख होते.

संदर्भ ग्रंथ:

०१) काटकर मा.भि. "नव्या पिढ्यांचा निर्माता कर्मवीर भाऊराव पाटील", अमेय प्रकाशन, पुणे. पृ.क्र. २४.
०२) तत्रैव. पृ.क्र. २८.
०३) तत्रैव. पृ.क्र. ३७.
०४) तत्रैव. पृ.क्र. ८२.
०५) तत्रैव. पृ.क्र. ८७.

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019

SPECIAL ISSUE- 82 (A)

पटकथा लेखन : स्वरुप आणि चिकित्सा

अतिथी संपादक :
डॉ. इंद्रजित जाधव
प्राचार्य,
बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक संपादक :
डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर
मराठी विभाग प्रमुख
बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक सहसंपादक :
प्रा. पोपट माने, डॉ. पुरुषोत्तम काळे

मुख्य संपादक :
डॉ. धनराज धनगर

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by CamScanner

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January -2019 Special Issue – 82 [A]

पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा

अतिथी संपादक :
प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव जि. पुणे

विशेषांक संपादक :
डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर,
मराठी विभाग प्रमुख,
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव जि. पुणे

विशेषांक सहसंपादक
प्रा. पोपट माने
डॉ. पुरुषोत्तम काळे

मुख्य संपादक : डॉ. धनराज धनगर

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-

Published by –
Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanraj@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे शीर्षक	लेखक/लेखिका	पृ.क्र.
1	A legendary Films and Film-Makers	Dr. Amina Khatun	05
2	पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा	श्रीनिवास भणगे	08
3	चित्रपट सृष्टीला दृगोच्चर करणारी पटकथा	डॉ. तुकाराम रोंगटे	13
4	तमिळ चित्रपट : एक दृष्टीक्षेप	डॉ. ताहेर पठाण	17
5	कन्नड मराठी पटकथा आणि वास्तव	डॉ. श्रीपती रायमाने	21
6	पटकथा लेखन :एक परिचय	डॉ.प्रमोद भगवान पडवळ	24
7	ठाकर जीवनावरील पटकथा लेखन	डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर	31
8	साहित्य आणि चित्रपट	डॉ. भास्कर ढोके	34
9	चित्रपट माध्यम आणि आदिवासी सामाज वास्तव	डॉ. वैजनाथ अनमूलवाड	40
10	पटकथा लेखन प्रक्रिया	सुरेश मेहेर	45
11	कथा ते पटकथा	डॉ. सुनील खामगळ	49
12	ऐतिहासिक कादंबरी आणि पटकथा लेखन	प्रा.चांगुणा कदम	57
13	माहितीपटाची संकल्पना आणि स्वरूप	डॉ. महेबूब सय्यद	59
14	माहितीपट निर्मितीचे तांत्रिक स्वरूप	डॉ. नवनाथ येठेकर	65
15	पटकथा लेखनप्रक्रिया	डॉ. राजेंद्र खंदारे	69
16	साहित्य आणि चित्रपट	डॉ. अनिल बांगर	73
17	पटकथा लेखन स्वरूप	डॉ. वंदना नढे	78
18	भारतीय प्रागतिक चित्रपट विशेष संदर्भ : 'काला'	मदन जाधव	80
19	पटकथालेखन : संकल्पना आणि स्वरूप	डॉ. प्रमोद धिवार	83
20	नाटक, पटकथा : शैली आणि तंत्र	प्रा. प्रमोद पवार	87
21	पटकथा लेखन आणि नाट्यलेखन	प्रा.विकास बहुले	91
22	पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा	प्रा. शुभांगी बारवकर	96
23	लघुपट,माहितीपट आणि चित्रपट (सिनेमा) पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा	प्रा. अपूर्वा बेतकेकर	98
24	पटकथेतील व्यक्तीरेखाटन आणि संवाद स्वरूप विशेष	प्रा.अरविंद जाधव	102
25	पटकथा लेखन आणि नाट्य लेखन यातील साम्य-भेद	डॉ. एम. एम. बागुल	106
26	पटकथा लेखनाचे तंत्र	डॉ. हनुमंत भवारी	110
27	पटकथा लेखन प्रक्रिया	सायली जगताप	113
28	चित्रपट, लघुपट, माहितीपट	डॉ.उज्ज्वला भोर	118
29	पटकथा लेखन- एक कला	डॉ. केतकी भोसले	122
30	चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेमध्ये कॅमेऱ्याचे महत्त्व	डॉ.बाळासाहेब चव्हाण	125
31	पटकथा लेखनाचे तंत्र	प्रा.तुकाराम चव्हाण	132
32	पटकथा आणि इतर कला	प्रा.अमोगसिद्ध चेडके	135
33	मराठी चित्रपटसृष्टीची वाटचाल	डॉ. अनुलु नारायण चौरे	138
34	पटकथा लेखन : संकल्पना व स्वरूप	डॉ.मधुकर बैकरे	144
35	साहित्यकृती व पारितोषिक प्राप्त चित्रपट	डॉ.सौ.मंगल डोंगरे	147
36	बाल नायकप्रधान श्यामची आई ते नाळ व्हाया टिंग्या : पटकथा लेखन	डॉ.दत्तात्रय डुंबरे	151

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune
Scanned by CamScanner

मराठी चित्रपटसृष्टीत विशुद्ध विनोदाची परंपरा निर्माण झाली. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ऐतिहासिक आणि पौराणिक मराठी चित्रपटांचा पाया भालजी पेंढारकरांनी घातला. राधा-कृष्णाच्या जीवनावर आधारित पौराणिक चित्रपट 'श्यामसुंदर' (१९३३) ह्या नावाने प्रदर्शित केला. तसेच त्यांनी दर्जेदार ऐतिहासिक चित्रपटांची निर्मिती केली. त्यामध्ये 'नेताजी पालकर' (१९४०), 'थोरातांची कमळा' (१९४१) व 'बहिर्जी नाईक' (१९४३) ह्या चित्रपटांमुळे भालजी पेंढारकर अजरामर झाले. समाजमनावर ह्या चित्रपटांनी अधिराज्य गाजवले. मात्र हा आनंद फारकाळ टिकला नाही. दुसऱ्या महायुद्धामुळे आणि आपापसातील कलहांमुळे प्रत्येकाने स्वतंत्रपणे चित्रपट संस्था निर्माण केल्या. त्यामुळे चित्रपटनिर्मितीचा खर्च वाढत गेला. थोड्या प्रेक्षकांच्या माध्यमातून तो वसूल होऊ शकला नाही. त्यामुळे वर्षाला फक्त ५ चित्रपट निर्माण झाले. एवढेच नव्हे तर मराठी चित्रपटांची स्पर्धा हिंदी चित्रपटांबरोबर असल्यामुळे चित्रपट दाखवण्यासाठी चित्रपटगृहे सुद्धा मिळत नव्हती. इ. स. १९४७ ते १९६० हा तेरा वर्षांचा कालखंड मराठी चित्रपट सृष्टीसाठी प्रतिकुल परिस्थितीचा ठरला तरीसुद्धा मराठी चित्रपटसृष्टीची परंपरा कायम राखण्याचे कार्य राजा परांजपे, अनंत माने, दत्ता धर्माधिकारी ह्या दिग्दर्शकांनी केले. ह्या संदर्भात सुधीर नांदगावकर म्हणतात, ''युद्धोत्तर मराठी सिनेमात राजा परांजपे हे अव्वल दिग्दर्शक ठरले, राजा परांजपेंचे 'पुढचे पाऊल'(१९५०), 'लाखाची गोष्ट'(१९५२),'पेडगावचे शहाणे'(१९५२), 'जगाच्या पाठीवर'(१९६०) हे चित्रपट यशस्वी ठरले. 'बालाजी मोरे'(१९५०), 'स्त्री जन्मा ही तुझी कहानी'(१९५२), 'पतिव्रता'(१९५९) या नायिकाप्रधान चित्रपटांद्वारे धर्माधिकारींनी स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण केले. धर्माधिकारींचे गाजलेले चित्रपट संकलित करणारे अनंत माने यांच्या 'प्रीती संगम'(१९५९), 'सांगत्ये ऐका'(१९५९), चित्रपटांना उदंड प्रेक्षक लाभला. मानेंनी मराठीत विनोदी कौटुंबिक व ग्रामीण तिन्ही प्रकारचे चित्रपट दिले.''[२] धर्माधिकारी यांनी स्त्री प्रश्नाला आपल्या चित्रपटात स्थान दिल्यामुळे साहजिकच स्त्रीवर्ग मराठी चित्रपटाकडे आकर्षित झाला. अनंत माने यांनी आपल्या चित्रपटात ग्रामीण आणि कौटुंबिक प्रश्नाला आपल्या चित्रपटात स्थान दिल्यामुळे खेड्यातील ग्रामीण माणूस मराठी चित्रपट पाहण्याकडे वळालेला दिसतो.

ग. दि. माडगूळकरांच्या रूपाने मराठी सिनेमाचे लेखन करणारा एक समर्थ लेखक मिळाला. त्यांनी 'ब्रम्हचारी', 'रामजोशी' आणि 'जय मल्हार' ह्या तीन चित्रपटांचे लेखन माडगूळकरांनी केले. ह्या चित्रपटांची गीतेसुद्धा माडगूळकरांनीच लिहिली. तिन्ही चित्रपट यशस्वी झाले. त्यामुळे मराठी साहित्याचे लेखन करणाऱ्या माडगूळकरांना मराठी चित्रपटसृष्टीत मानाचे स्थान प्राप्त झाले. पु. ल. देशपांडे यांनी १९५२ साली 'गुळाचा गणपती' हा विनोदी चित्रपट प्रदर्शित केला. आणि मराठी चित्रपटसृष्टी मधून बाहेर पडले. आचार्य अत्रे यांची स्वतःची असे पिक्चर्स संस्था होती. त्यांच्या 'श्यामची आई' (१९५३) ह्या चित्रपटास पहिला राष्ट्रपती सुवर्णपदकांचा सन्मान मिळूनही त्यांनी स्वतःची संस्था बंद केली. महाराष्ट्र राज्याची स्थापना होण्याच्या अगोदर, तमाशावर आधारीत चित्रपटांची लाटच आली होती. ह्यामध्ये कौटुंबिक आणि ग्रामीण प्रश्न मांडल्यामुळे ग्रामीण आणि मध्यमवर्गातील प्रेक्षकवर्ग लाभला. ह्या काळात 'सांगत्ये ऐका' नावाचा चित्रपट प्रचंड गाजला. या चित्रपटाच्या प्रभावाखाली इतर चित्रपटांची निर्मिती झालेली दिसते. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. १९६२ साली मराठी चित्रपटांना केंद्र सरकारच्या धर्तीवर आधारीत पारितोषिक द्यायला सुरूवात झाली होती. पहिल्या वर्षी मधुकर पाठक यांच्या 'प्रपंच' राजा परांजपे यांच्या 'सुवासिनी' आणि अनंत माने यांच्या 'शाहीर परशुराम' ह्या चित्रपटांना पारितोषिके मिळाली. ह्या चित्रपटांची कथा-पटकथा संवाद, गीते ही ग. दि. माडगूळकरांनी लिहिलेली होती. तिन्ही चित्रपट हे सामाजिक विषयावर

Scanned by CamScanner

पटवर्धन यांचा '२२ जून १८९७' जब्बार पटेल यांची 'सिंहासन' (१९७९), डॉ. लागू यांचा 'झाकोळ' (१९८०) इतर चित्रपटांचा उल्लेख करता येतो.

इ.स. १९८० चे दशक हे विनोदी चित्रपटाचे दशक म्हणून ओळखले जाते. ह्या कालखंडात व्ही. के. नाईक यांचा 'गोधळात गोंधळ'(१९८१) डॉ जब्बार पटेल यांचा 'उंबरठा', अमोल पालेकरांचा 'आक्रित' हे चित्रपट प्रदर्शिक झाले, 'उंबरठा' आणि 'आक्रित' ह्या चित्रपटांचे कथालेखन विजय तेंडूलकरांनी केले होते. हे दोन्ही चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन पोहचले. स्त्री प्रश्नावर आधारीत 'उंबरठा' सिनेमा याच कालखंडात प्रदर्शित झाला. हा चित्रपट शांता मिसळ यांच्या 'बेघर' आत्मकथनावर आधारीत होता. याच कालखंडात रंगमंचाकडून चित्रपट सृष्टीकडे वळालेले विजय मेहता आणि अरविंद देशपांडे यांचा प्रभाव मराठी चित्रपटसृष्टीत जाणवला नाही. त्यांनी 'स्मृतिचित्रे'(१९८४) व 'शापित'(१९८२) हे चित्रपट प्रदर्शित केले. तसेच दामू केंकरे यांनी 'तुझ्यावाचून करमेना' (१९८६) हा विनोदी चित्रपट प्रदर्शिक केला. यानंतर मराठी चित्रपटसृष्टीत विनोदाची लाट आलेली दिसते. सचिन पिळगावकरांचा 'नवरी मिळे नवऱ्याला' (१९८४), महेश कोठारे यांचा 'धूमधडाका' (१९८५) हे विनोदी चित्रपट प्रदर्शित झाले. वसंत सबनिसांनी 'नवरी मिळे नवऱ्याला' या चित्रपटाचे कथानक लिहिले. तर अण्णासाहेब देऊळगावकरांनी 'धुमधडाकाचे' कथानक लिहिले. ह्या संदर्भात सुधीर नांदगावकर म्हणतात की, ''सचिन आणि महेश यांनी हिंदी चित्रपटांचे अनुकरण मराठीत केले. सचिनचे नंतर 'गंमत जंमत' (१९८५) 'अशी ही बनवाबनवी' (१९८६) हे विनोदी चित्रपट तुफान यशस्वी झाले. महेशचे 'दे दणादण' (१९८५) 'थरथराट' (१९८६) ही विनोदी चित्रपट लोकप्रिय झाले.''[३] ८० च्या दशकातील मध्यमवर्गीय आणि ग्रामीण प्रेक्षक विनोदी सिनेमाकडे वळालेला दिसतो. त्यामुळे राजदत्त यांचा 'पुढचं पाऊल' (१९८६) हा सामाजिक चित्रपट दुर्लक्षित झाला. तसेच सतीश रणदिवेंचा 'बहुरूपी' (१९८४) हा गंभीर चित्रपटसुद्धा प्रेक्षकांनी दृष्टीआड केला. यानंतर मात्र कांचन नायक यांनी 'कळत नकळत' (१९८९) हा कौटुंबिक कथानकावर आधारीत चित्रपट प्रदर्शित केला. ह्या चित्रपटाला प्रेक्षकांनी बऱ्यापैकी प्रतिसाद दिला. यानंतर पुरुषोत्तम बेर्डे यांनी 'हमाल दे धमाल' (१९८९) ह्या विनोदी चित्रपटाची निर्मिती केली. प्रेक्षकांनी याला भरभरून चांगलाच प्रतिसाद दिला.

इ.स. १९९० नंतर विजय कोंडके यांनी 'माहेरची साडी' नावाचा चित्रपट प्रदर्शिक केला. ह्या चित्रपटाला ग्रामीण स्त्रियांनी, कामगार स्त्रियांनी भरभरून प्रतिसाद दिला. कौटुंबिक कथानकावर आधारीत स्त्री प्रधान चित्रपटाने मराठी स्त्री मनावर अधिराज्यच गाजवले. महाराष्ट्रातील तळागाळातील शेतकरी कुटुंबातील, शहरातली मोलकरणी, गिरणी कामगार, झाडू कामगार अशा तळागाळातील प्रेक्षकांनी 'माहेरची साडी' ह्या चित्रपटास गर्दी केली. मराठी प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद ह्या चित्रपटास मिळाला. या चित्रपटाच्या धर्तीवर दादा कोंडके यांनी 'सासरचे धोतर' (१९९६) हा विनोदी चित्रपट प्रदर्शित केला. मराठी सिनेमा पुन्हा जुन्या फॉर्म्युल्यात अडकणार अशी भिती निर्माण झाली होती. मात्र १९९० नंतरच्या जागतिकीकरणामुळे मराठी सिनेमाचा प्रेक्षकवर्ग घटला होता. घराघरात विविध टीव्ही, चॅनेल्स पोहचल्यामुळे घर बसल्या बसल्या असंख्य चित्रपट प्रेक्षकांना पाहायला मिळत होते. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी चित्रपटांना उतरती कळा लागली होती. जब्बार पटेल यांनी 'एक होता विदूषक' (१९९२), पुरुषोत्तम बेर्डेचा 'भस्म' (१९९४) व स्मिता तळवळकर यांचा 'सवत माझी लाडकी' (१९९२) हे चित्रपट प्रदर्शिक झाले. परंतू ह्या सिनेमांना प्रेक्षकांचा म्हणावा तसा प्रतिसाद लाभला नाही.

294

Scanned by CamScanner

यशवंत दत्त, स्मिता पाटील, अजिंक्य देव, अलका कुबल, रीमा, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन, निवेदिता जोशी, सुप्रिया पिळगावकर, अतुल कुलकर्णी, सोनाली कुलकर्णी, अरुण नलावडे, संदीप कुलकर्णी, संजय नार्वेकर, भरत जाधव, मकरंद अनासपुरे, सिद्धार्थ जाधव अशा कितीतरी कलाकरांनी मराठी चित्रपटात आपल स्वतःच स्थान निर्माण केले.''[६] प्रत्येक कालखंडात ह्या कलावंतांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. आपल्या वेगळ्या व्यक्तिमत्त्वाने ते चित्रपटसृष्टीत अजरामर झाले. मराठी चित्रपटांना संगीतकारांची एकनवी पिढी मिळाल्याने मराठी चित्रपटसृष्टी अधिकाधिक बहरलेली दिसते. ह्यामध्ये भास्कर चंदावरकर, आनंद मोडक, अशोक पत्की, श्रीधर फडके, अजय-अतुल, सलील कुलकर्णी, इतर संगीतकारांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर मराठी चित्रपट झळकले आहेत. मराठी साहित्यिकांनी समाजातील महत्त्वपूर्ण प्रश्नांना हात घालून प्रत्येक कालखंडात मराठी चित्रपटांना नव-नवे कथानक दिले. त्यामुळे प्रत्येक कालखंडातील मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीला उतरलेले दिसतात. मराठी चित्रपटांमधून ग्रामजीवन, शहरीजीवन, चाळसंस्कृती, स्त्रीप्रश्न, हुंडाप्रश्न, ग्रामीण राजकारण, शैक्षणिक अडचणी, सहकारातील भ्रष्टाचार, लावणी-पोवाडा, तृतीयपंथीयांचे प्रश्न, जागतिकीकरणाचा परिणाम, मनोरंजनात्मक रहस्यमय अशा अनेक विषयांना घेऊन मराठी चित्रपटाने आजपर्यंतची वाटचाल केली आहे. समाज-साहित्य आणि मराठी चित्रपट यांची साखळीवजा गुंफण असून ती एकमेकापासून वेगळी करता येणार नाही. त्यांचा एकमेकांशी अतुट असा संबंध असल्याचे दिसून येते.

संदर्भ ग्रंथ

१. कर्णिक मधु मंगेश, (संपा.), 'सांस्कृतिक महाराष्ट्र १९६० ते २०१० भाग-१', प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २०११, पृ.क्र. ५८
२. तत्रैव, पृ.क्र. ४०
३. तत्रैव, पृ.क्र. ४८
४. तत्रैव, पृ.क्र. ७०, ७१
५. तत्रैव, पृ.क्र. ७१
६. तत्रैव, पृ.क्र. ७१

Scanned by CamScanner

३० 8

ISSN 2454-7409

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
यांचा संयुक्त उपक्रम

मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

Peer Reviewed Annual National Research Journal As Per UGC Guidelines
VOL 4 ISSUE 1
वर्ष चौथे, अंक पहिला, जानेवारी २०१९
URL: http://www.indiramahavidyalaya.com/pdf_show.php?unum=97

मुख्य संपादक
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब

प्रकाशक
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

मुद्रक
सेवा प्रकाशन
विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

मुखपृष्ठ
डॉ. पवन मांडवकर

Communication
Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
e mail – **marathipradhyapak@gmail.com**
Alternate mail id – **imvkalamb@yahoo.co.in**
Tele. 07201-226170, 226147, 226129 Mob. 9422867658. 9403014885
Website: www.indiramahavidyalaya.com

जानेवारी, २०१९

१९९० नंतरच्या नवकवींची ग्रामीण कविता

प्रा.डॉ. अतुल नारायण चौरे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंध, पुणे
भ्रमणध्वनी ८१६९४२४५१७ / ८६९२०८०२१०, इ-मेल :choureatul.paru@gmail.com

प्रास्ताविक

ग्रामीण साहित्याला पुन्हा नवे बळ देण्याचे कार्य संपादक प्रा. बाळासाहेब घोंगडे हे अक्षरपेरणी मासिकाच्या माध्यमातून करीत आहेत. त्यांनी दिवाळीच्या मुहर्तावर सप्टेंबर २०१५ साली 'कविता विशेषांक' प्रकाशित केला. त्यामधून जवळपास ६७ कवींच्या कविता प्रकाशित केल्या आहेत. हा 'कविता विशेषांक' म्हणजे ग्रामीण कवितेचा दस्तऐवज आहे. ह्या कविता विशेषांकामधील सर्वच कवी नवकवी आहेत. नवकवींचे साहित्य □त्रितपणे प्रकाशित करता येणे ही आजच्या काळातील मोठी समस्या आहे. काही नवकवींच्या कविता साप्ताहिक, मासिके, त्रैमासिके आणि दिवाळी अंकांमधून प्रकाशित होतात आणि काहींच्या कवितांना प्रकाशनाची संधीच मिळत नाही. परंतु ग्रामीण साहित्याचे अभ्यासक, संशोधक आणि संपादक प्रा. बाळासाहेब घोंगडे यांचे मला विशेष कौतुक करावेसे वाटते की, त्यांनी ग्रामीण साहित्याची पुन्हा पायाभरणी केली. संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण कवी, लेखकांना □त्रित आणण्याचे कार्य अक्षरपेरणी मासिकाच्या माध्यमातून केल्यामुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याला उभारी मिळाली आहे, असे मला वाटते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अक्षरपेरणी मासिकाच्या 'कविता विशेषांकामधील' निवडक कवींच्या कवितांचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे.

१९९० नंतरच्या नवकवींची ग्रामीण कविता

'अक्षरपेरणी' मासिकातील कविता विशेषांकाचा विचार करता असे दिसते की, १९९० नंतर आलेल्या जागतिकीकरणाचा शहरीकरणाबरोबरच ग्रामाजीवानावरसुद्धा परिणाम झाला आहे. अनेक नवकवींच्या कवितेमधून याचे चित्रण आलेले आहे. ह्या अंकामधील कविता महानगर, ग्रामजीवन आणि स्त्रीजीवन व्यक्त करताना दिसतात. चंद्रकांत पोतदार म्हणतात की, 'कविता ही आतली सल असते' आपल्या कवितेमधून गावाचे, शेतीचे–मातीचे चित्रण करताना म्हणतात की, 'मातीची मुळच बोलू पाहातायत'

" बांधामेढीवरली करपलेली घर
आणि लगीनघाईसारखे सुगीचे दिवस
अवजारान आणि बैलांच्या संगतीने
शिवार फुलवाव, गाळावा घाम
भाकरी सुगंधावी कष्टान"[१]

शेतीचे वर्णन करताना चंद्रकांत पोतदार म्हणतात की, सुगीच्या दिवसांत शेतकऱ्याच्या घरामध्ये लगीन घाई असते. सुगीच्या दिवसात शेतामधील पीक घरामध्ये आणेपर्यंत शेतकऱ्याला चैन नसते. कारण दिवसात अवकाळी वादळ-वारा येण्याची दाट शक्यता असते. अशावेळी हाता तोंडाशी आलेला घास जाण्याची शक्यता असते. त्यामुळे अवकाळी पावसाच्या अगोदर शेतातील पीक घरात आणण्याची लगीनघाई असते. शेतकरीराजा बैलांच्या सहायाने आपली शेती फुलवतो. ती फुलवताना वर्षभर शेतात घाम गाळतो आणि कष्टाने कमावलेली भाकरी खातो. □दरीतच चंद्रकांत पोतदार यांची कविता शेतकऱ्याच्या मनातील आतली सल व्यक्त करताना दिसते. शेतीमातीत जन्माला आलेले कवी जनार्धन देवरे म्हणतात की, 'व्यक्त होण्यासाठी कविता मला गरजेची वाटू लागली'. आपल्या आई – वडिलांचा, आजी आजोबांचा शेतीशी चाललेला झगडा लेखकाने बालपणापासून पाहिलेला आहे. त्यामुळे आपल्या कवितेमधून ही सल व्यक्त करताना ते 'संचिताचे भांडवल' या कवितेत म्हणतात की,

"रुसलेल्या पावसानं औंदा जाळलं स्वप्नांना
दुष्काळाची साडेसाती □ संपता संपेना
आद्रपुनर्वसू पुष्य गेले कोरडे ठणान

297

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

आता जमिनीत पाणीच राहिले नाही. गावाकडील विहिरी भर पावसाळ्यात कोरड्या पडल्या आहेत. म्हणून अनेक शेतकऱ्यांनी सावकाराकडून कर्ज काढून आपल्या जमिनीत बोर मारले आहे. पण पाण्याचा एक थेंबही लागला नाही. अशावेळी घेतलेले कर्ज कसे फेडायचे असा प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा राहतो. त्यामुळे तांब्याभर पाण्यात थायमेट कालउन तो स्वतःला संपवण्याचा प्रयत्न करताना दिसतो. मानवाने निसर्गाला ओरबाडल्यामुळे निसर्गाने मानवाकडे पाठ फिरवलेली दिसते. पूर्वी रस्त्यावर जागो-जागी पाणपोया होत्या. आता मात्र गावोगाव टॅन्करने पाणी पुरवावे लागते. अशाप्रकारचे दाहक वास्तव फुला बागुल मांडताना दिसतात. "कविता हा माझ्या जगण्याचा श्वास आहे." असे स्वाती शिंदे-पवार म्हणतात. स्वतःला मोकळे करण्यासाठी मी कविता लिहिते. मी मातीशी इमान राखते, स्वतःचे गाऱ्हान,रडगान गात बसण्यापेक्षा अखंड मानवजातीची मी प्रेरणाश्रोत, मार्गदर्शक होते. अशाप्रकारचा आशावाद त्या व्यक्त करताना दिसतात. 'लेक भुईची' या कवितेमधे त्या म्हणतात की,

"पोर कुणब्याची, लिंबू वेचायची
शेती भांगलन, ओचा खोचायची
मोट धरताना, बांध काटायचा
पळ पळताना, घाम सांडायचा"[५]

ग्रामजीवनाचे नेमक्या शब्दात वर्णन केले आहे. शेतकऱ्याच्या मुलीला शेतात काम करावेच लागते.लिंबू वेचन्यापासून शेतात खुरपण्यापर्यंत काम करावेच लागते.पूर्वी विहिरीमधील पाणी काढण्यासाठी मोटेचा वापर केला जात असे. तेव्हा घामाच्या धारा सांडायच्या शेतातील कामे करताना अनेकांना बैलांची गरज लागत असे. अनेक शेतकऱ्यानकडे बैल घेण्याइतपतसुद्धा पैसे नसायचे. अशावेळी शेतकरी स्वतःच बैल व्हायचा. एकंदरीतच शेतकऱ्याच्या कस्टमय जीवनाचा आलेख व्यक्त करणारी त्याची कविता आहे. 'गावगाड्यातल दुखः मांडून व्यवस्थेला जाग आणण' ही भूमिका घेऊन रावसाहेब कुवर लेखन करताना दिसतात. लहानपनापासून शेती-माती, गुरे-ढोरे,उन-वारा, शेतीपासून रोजगार हमीच्या कामापर्यंत राबलेला हा कवी आहे. त्यामुळे सहाजिकच त्यांच्या कवितेमधून ग्रामजीवनाचे आणि कृषी जीवनाचे दाहक वास्तव मांडताना दिसतात. 'पुन्हा एक शेतकरी संपला' ह्या कवितेच्या माध्यमातून रावसाहेब कुवर म्हणता की,

"सततच्या दुष्काळाला वैतागून
धरला त्याने सुरतेचा रस्ता
आणि जाऊन बसला
दूरच्या नातेवाईकांच्या आसऱ्याला
घरदार नसलेल्या डोंबाऱ्याने
करावा रात्रीपुरता मुक्काम
ग्रामपंचायतीच्या ओट्यावर तसा"[६]

महाराष्ट्रातील अनेक भागात सातत्याने पडणाऱ्या दुष्काळाचे दाहक वास्तव कवीने व्यक्त केले आहे. सततच्या दुष्काळाला कंटाळून शेतकरी कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी घर-दार सोडून शहरात नोकरीसाठी जातो. त्यामुळे गावाकडील शेती-वाडी, घर-दार उध्वस्त होते. शहरातीत कारखान्यात स्वतःला आठ-आठ तास अडकवून घेतो. चार-चार तास ओव्हरटाईम करतो. गावाकडील घर-दार, शेती-वाडी विकून शहरात जाऊन रहातो. बायकोच्या डोळ्यात झगमगणारे शहर बसलेले असते, मुलांना रेल्वेच्या डब्यात बसल्याचा मनोमन आनंद होतो. परंतु गाव सोडलेल्या शेतकऱ्याच्या मनात वेगळ्याच वादळ-लाटा उठलेल्या असतात. सुटत चाललेली भाऊबंदकी, घरदार, बैलघोटा, शेतशिवार ह्यामुळे तो मनातून अस्वस्थ आहे. त्यामुळे लेखक म्हणतो की, त्या दिवशी पुन्हा एक शेतकरी संपला. तो शेतकरी अस्वस्थतेमुळे संपला की, आपल्या व्यवस्थेमुळे संपला असा प्रश्न समाजव्यवस्थेला विचारला आहे. शेतकऱ्याच्या दाहक वास्तवाबरोबर, शेतकऱ्याच्या मुलांचा प्रश्नालाही वाचा फोडली आहे. 'खेड्यातील पोर बसली आहेत येड्यासारखी' ह्या कवितेमधून कवी सांगतो की,

"डीएड, बीएड होऊन
सरकारी जावई होण्याच्या नादात
निघून गेल त्याच्या अंगातून शेतीकाम

नात्यांबद्दल आत्मियतेने आणि तळमळीने बोलत रहातो. कैलास दौंड नावाचे कवी म्हणतात की, 'कविता ठरवून नव्हे तर आतून यायला पाहिजे'. ते गावबीव नावाच्या कवितेत म्हणतात की,

"शेतीचं अनुदान बॅंकेत जमा झाल्याची
मानसं होत राहतात गावजमा
दगडा-दगडांवर बसतात टेकउन बूड
त्याच्याशीही आदिम नात सांगत
अंधार वाढत जातो खोल-खोल
मानस जातात अंधारात झोपी-बिपी
उद्याच्या मृगजळी पुराची स्वप्ने पहात"[१०]

१९९० नंतर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दुष्काळ पडला. दुष्काळाच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कर्जमाफी योजना जाहीर केली. काहींना कर्जमाफी मिळाली, तर काहींना फक्त आश्वासने, काहींच्या बॅंक खात्यात शेतीचे अनुदान तर काहींची खाती अनुदानाची वाट पाहत आहेत. अशावेळी सगळा गाव एकत्र जमतो. शेतीच्या अनुदानावर तासन-तास चर्चा केली जाते. उद्याची भावी स्वप्ने मनाशी घेऊन माणसे अंधारात झोपी जातात. कमरे इतक्या मृगजळाने बनली आहेत इथली शेती आणि बागाईते. अशा स्वरूपाचे विदारक वास्तव कवी मांडताना दिसतो. रावसाहेब जाधव आपल्या कवितेबद्दल म्हणातात की, 'केंद्रापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करणारी माझी कविता आहे.' ज्या परिसरात रंगलो, रमलो, तरंगलो, जगलो, वाढलो ती माती, शिवार, शिवार, माणसे, जनावरे, जीवजंतू, ऋतू, आकाळ-अवकाश, आशा-निराशेचा सगळा परीघ पेलताना त्याच्या केंद्रापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करणारी कविता रावसाहेब जाधवांची आहे. 'जगवा राव' नावाच्या कवितेत कवी म्हणतो की,

"स्मार्ट सिटी बनवताना स्मार्ट शेती बी बनवा राव
उगवण्यापुरती जागा अन पेर्ता माणूस
जगवा राव
वाफस्याला वाप्यावाप्यात वाय-फाय पेरू आम्ही
दबला दाणा कोंबाळण्याला थोडे खत
पुरवा राव"[११]

